**प्रेस नोट दिनांक १८/०६/२०१९**
**उत्तमनगर पोलीस ठाणे पुणे**
**भादविक ३७९,३४ मधील गुन्ह्यांतील दोन विधीसंघर्षीत बालक ताब्यात**

दिनांक ३/६/२०१९ रोजी दुपारी १२.०० ते १६.०० वाजण्याचे दरम्यान खडकवासला धरणाचे खालील बाजूस पीएमटी बस स्टॉपच्या मागे झाडाचे आड तक्रारदार योगेश जयंत दौंडकर रा.११०/१०३५ गोखलेनगर पुणे यांनी त्यांची मोपेड गाडी लॉक व पार्क करुन ठेवली असता कोणीतरी चोरटयांनी त्यांचे वाहनाचे डीक्की कश्याचे तरी साहाय्याने उघडून त्यातील २५,०००/- रु.किंमतीचा वनप्लस कंपनीचा मोबाईल व ड्रायव्हींग लायसेन्स चोरुन दिले बाबत तक्रार दिल्याने त्याबाबत उत्तमनगर पोलीस ठाण्यास गुन्हा नोंद क्रमांक ५८/२०१९ भादंवि क.३७९,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील चोरटयांचा तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री.के.के.कांबळे व त्यांचे पथकाने मागोवा घेतला असता त्यांनी मिळालेल्या माहिती नुसार २ विधी संघर्षित बालक यांनी वरील गुन्हा केल्याचे समजून आलेने त्यांना दिनांक १३/६/२०१९ रोजी ताब्यात घेवून त्यांचेकडून गुन्हयात चोरीस गेलेला मोबाईल हस्तगत केला आहे.सदर विधी संघर्षित बालक यांना बाल न्याय मंडळ यांचेकडे लागलीच पाठविण्यात आले आहे.